## नमुना भाग १

## खाजगी क्षेत्रातील जमीन खाजगी वाटाघाटीव्दारे थेट खरेदी पध्दतीने ताब्यात घेण्याबाबत जाहीर नोटीस

*******************************************************************

क्र.उजि/भूसं/मुं.श/सा.प.नि./जाहीरात/ ५५८ /२०१८
उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) मुंबई शहर,यांचे कार्यालय
पहिला मजला, डी.डी.इमारत,जुने जकात घर, शहिद
भगत सिंग मार्ग, फोर्ट, मुंबई-०१
दिनांक - २८/१०/२०१८

ज्या अर्थी उप मुख्य अभियंता (सी) दादर (पुर्व), मध्य रेल्वे, मुंबई यांचेकडील पत्र क्र.DR/DRG/ Land Acquisition 5th & 6th Line दिनांक ०५/०२/२०१८ व दिनांक २६/०३/२०१८ अन्वये मुंबई छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस ते कुर्ला ५ वी व ६ वी लाईन या सार्वजनिक प्रयोजनाकरीता शासन निर्णय क्र. शासन निर्णय क्र.संकीर्ण-०३/२०१५/प्र.क्र.३४/अ-२ दिनांक १२/०५/२०१५, शासन निर्णय क्र.०३/२०१५/प्र.क्र.३४/अ-२ दिनांक ३०/०९/२०१५ व शासन निर्णय क्र. संकीर्ण ०४/२०१६/ प्र.क्र.४९ /अ-२ दिनांक २६/०५/२०१६ रोजी मधील तरतूदीस अनुसरुन खाजगी क्षेत्रातील जमीन खाजगी वाटाघाटीव्दारे थेट खरेदी पध्दतीने मध्य रेल्वे मुंबई यांचे नावे घेणेकामी प्रस्ताव जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांचेकडे सादर केला आहे.

आणि त्याअर्थी जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांचेकडील आदेश क्र. उ.जि./भू.सं./मुं.श./म.रे.मु/५ वी व ६ वी लाईन/५५३/२०१८ दिनांक १६/१०/२०१८ अन्वये उक्त प्रस्ताबासंबंधी उक्त शासन निर्णयान्वये कार्यवाही करण्याबाबत उपजिल्हाधिकारी (भूसंपादन), मुंबई शहर यांना निर्देश दिलेले आहेत.

त्याअर्थी आता

१) उक्त शासन निर्णय आणि शासन परिपत्रकातील तरतुदीनुसार मी, सुषमा सातपुते उपजिल्हाधिकारी, (भूसंपादन) मुंबई शहर याव्दारे

(एक) अनुसूची एक मध्ये नमुद खाजगी क्षेत्रातील जमीन खाजगी वाटाघाटीव्दारे थेट खरेदी पध्दतीने मुंबई छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस ते कुर्ला ५ वी व ६ वी लाईन करीता मध्य रेल्वे यांचे नावे घेण्याबाबत जाहीर नोटीस प्रसिध्द करीत आहे आणि

(दोन) प्रकल्पासाठी जमीन थेट खरेदीने घेताना जिल्हास्तरीय समितीमार्फत **भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम-२०१३,** मधील कलम २६ ते ३० व या कायद्याच्या अनुसूची १ च्या तरतूदीनुसार संबंधित जमिनींसाठी परिगणित होणाऱ्या एकूण मोबदल्याच्या रक्कमेवर २५% रक्कम वाढीव देऊन, मोबदला निश्चित करण्यात येईल.

(तिन) संबंधित भूधारकांकडून शासनाच्या प्रचलित धोरणाप्रमाणे खाजगी जमीन वाटाघाटीव्दारे मुंबई

छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस ते कुर्ला ५ वी व ६ वी लाईन करीता मध्य रेल्वे यांचे नावे खरेदी देण्यास स्वेच्छेने तयार असल्याबाबत व जिल्हा स्तरीय समितीने निश्चित केलेला मोबदला संपूर्णत: व अंतिमरीत्या स्विकारण्यास तयार असल्याबाबतची संमतीपत्रे (विकल्प) मागवित आहे.

२) संबंधित भूधारकांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यानंतर विहीत नमुन्यातील संमतीपत्रे (विकल्प) उपजिल्हाधिकारी, (भूसंपादन) मुंबई शहर यांचेकडे दाखल करावीत.

३) संमतीपत्राचा (विकल्प) विहीत नमुना उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) मुंबई शहर यांचे कार्यालय पहिला मजला, डी.डी.इमारत, जुने जकात घर, शहिद भगत सिंग मार्ग, फोर्ट, मुंबई- ४०० ००१ यांच्या कार्यालयामध्ये उपलब्ध आहे. तसेच सदर नमुना मध्य रेल्वेचे प्राधिकृत अधिकारी व उपमुख्य अभियंता (सी) दादा साहेब फाळके मार्ग, दादर (पूर्व) मध्य रेल्वे मुंबई- ४०० ०१४ यांच्या कार्यालयात भूधारकांना उपलब्ध राहील.

४) सदर प्रकल्पासाठी निश्चित करण्यात आलेल्या क्षेत्राच्या आराखड्याची प्रत उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) मुंबई शहर, तसेच प्रकल्प अधिकारी मध्य रेल्वे मुंबई, उप मुख्य अभियंता (सी) दादर (पूर्व) मुंबई या कार्यालयाकडे कार्यालयीन वेळेत भूधारकांना किंवा हीतसंबंधित व्यक्तीना तसेच जनतेस निरीक्षणासाठी खुली ठेवण्यात आली आहे.

**अनुसुची – एक**
**खरेदी द्यावयाच्या जमिनीचा तपशील**
**जिल्हा- मुंबई शहर**

| अ.क्र. | गावाचे नाव | भूकर क्रमांक | क्षेत्र (चौ.मी.मध्ये) |
|---|---|---|---|
| १ | धारावी | ४९५ पैकी | ७२३ चौ.मी. |
| २ | | ४९६ पैकी | २८ चौ.मी. |
| ३ | | ६७१ पैकी | २००३ चौ.मी. |
| ४ | | १/६७८ पैकी | ३५७.२३ चौ.मी. |

सुषमा सातपुते,
उपजिल्हाधिकारी (भूसंपादन),
मुंबई शहर

E:\Railway CST & WR\जाहिर नोटीस.doc